<u>प्रेसनोट दि. ०६/०५/२०१९</u>

## डोंगर चढाई चपळाईने करुन जंगलामध्ये हिंस्त्र प्राण्याची तमा न बाळगता अपहरित अल्पवयीन मुलीची सुटका

दि.०२/०५/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, यांना पोना किरण अब्दागिरे यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे चतुंश्रृःगी पोलीस स्टेशन गु.र.नं. १४३/२०१९ मधील अपहृत मुलगी व आरोपी हे मु.पो. तव (लवासा)ता.मुळशी, जि.पुणे येथे असल्याबाबत खात्रीशीर सांगितलेने.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनिषा झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली चतुंश्रृःगी पोलीस स्टेशन कडील गु.र.नं. १४३/२०१९ भा.द.वि. कलम ३६३ मधील अपहृत मुलगी दिनांक ०८/०२/२०१९ रोजी कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन पळवुन नेले बाबत दिलेल्या तक्रारी वरुन चतुश्रृंःगी पोलीस स्टेशन दाखल गुन्हयाचा समांतर तपास सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा यांनी करून अत्यंत कमी दुव्यावरून तांत्रिक विश्लेषण करून अपहृत मुलगी व आरोपी हे मु.पो. तव(लवासा)ता.मुळशी, जि.पुणे येथे धरणाचे पलीकडील डोंगरावर लपुन बसल्याचे समजलेने सदर ठिकाणी अत्यंत जिकरीने डोंगर चढाई चपळाईने करुन जंगलामध्ये हिंस्त्र प्राण्याची तमा न बाळगता. सदर अपहृत मुलगी व आरोपी मिळुन आल्याने त्यांना स्टाफच्या मदतीने तात्काळ ताब्यात घेवुन पुढील तपासकामी चतुश्रंःगी पो.स्टे. चे ताब्यात देवुन गुन्हा तात्काळ उघडकीस आणला.

वरील नमुद कारवाई मा.श्री.भानुप्रताप बर्गे,सपोआ,गुन्हे-२,यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, मपोउनि योगिता कुदळे, पोहवा रमेश लोहकरे, मपोहवा ननिता येळे, पोना राजेंद्र ननावरे, पोना निलेश पालवे, पोशि संदिप गायकवाड, पोशि किरण अब्दागिरे या पथकाने केली आहे.